महाराष्ट्र शासन

ग्राम विकास व पंचायत राज विभाग,

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई-४००००१.

Email ID :- sopr1.rdd-mh@nic.in

---

क्रमांक :-झेडपीए-२०२५/प्र.क्र.७८ (Comp.No.१४४०१७१)/पंरा-१ दिनांक :- २० जानेवारी, २०२६.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, (सर्व).

विषय:- मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या राज्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांअतंर्गत भटक्या कुत्र्यांचे लसीकरण करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांकित उप सचिव, कृषी, पदुम यांचे पत्र क्र.DAHD-१३०११/२०३/२०२५-DAHD-AH३ (१४१६५९३), दि. १४ जानेवारी, २०२६ ची प्रत सोबत जोडली आहे.

२. प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ मधील नियम ८(२) नुसार भटक्या कुत्र्यांचे लसीकरण करण्याची जबाबदारी संबधित स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे.

३. भटक्या कुत्र्यांचे लसीकरण करण्यासाठी Anti-Rabies लसीची खरेदी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभामार्फत खरेदी करण्यात येणार आहे. त्याचे वितरण आयुक्त, पशुसंवर्धन यांचेकडून आवश्यतेनुसार व मागणी प्रमाणे करता येणे शक्य आहे, असे उपरोक्त प्रत्रात नमूद केले आहे. यास्तव ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या अधिपत्याखालील येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे लसीकरण करण्यासाठी कुत्रे पकडण्याची व लसीकरणानंतर त्यांना सोडून देण्याची व्यवस्था व इतर आनुषंगीक सुविधा उपलब्ध करून दिल्यास कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडील मनुष्यबळाद्वारे लसीकरण करण्यात येईल, असे देखील उपरोल्लिखीत पत्रात नमूद केले आहे.

४. यास्तव आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भटक्या कुत्र्यांचे लसीकरण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या Anti-Rabies लसमात्रेची संख्या आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे यांना तात्काळ कळविण्यात यावी, ही विनंती.

(क.श्री.पोतदार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत-वरीलप्रमाणे

प्रत- १. आयुक्त, पशुसंवर्धन, आयुक्त पशुसंवर्धन कार्यालय, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे.
२. संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीसाठी.

D:\PRAKASH SHENDGE\जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रशासकीय बाबी\CR ७८-२०२५ COMP.NO.१४४०१७१- मानव-श्वान संघर्षाच्या गंभीर घटनांबाबत.DOCX ३५